# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)


| मुख्यालय: उद्योसारथी इमारत, मऔविम मरोल औद्योगिक क्षेत्रमहाकाली गुंफा मार्ग अंधेरी पुर्व मुंबई-93 | ॥ उद्यमात् सकल समृध्दिः ॥ मऔविम | कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग यांचे कार्यालय, 2 रा मजला उद्योशक्ती इमारत औरंगाबाद औद्योगिक क्षेत्र रेल्वे स्टेशन रोड औरंगाबाद पीन 431005 दुरघ्वनी (240) 2342188, 2341287 फॅक्स 2342186 |
|---|---|---|
| Web:www.midcindia.org. | | Email to -eeaurangabad@midcindia.org. |


IFMS No / Camp / 01 /2016 दि. 18.04.2016.

प्रति,
मा. उपसंरक्षक
वन्यजीव संरक्षण विभाग,
चेतक घोडयाजवळ,
गारखेडा परिसर, औरंगाबाद.

विषय : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मध्यवर्ती पाणी पुरवठा योजनेसाठी आपातकालीन परिस्थतीमध्ये नाथसागर धरणामध्ये चर खोदणे व पाणी पुरवठयाचे पम्पस् लावण्याची परवानगी मिळणे बाबत

संदर्भः 1. मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना
2. या वर्षीची दुष्काळी परिस्थिती
3. या कार्यालयाने मा. जिल्हाधिकारी यांना लिहीलेले पत्र क्र बी-15732 दि 18.04.2016.

महाराष्ट्र औद्येगिक विकास महामंडळाने विविध औद्योगिक क्षेत्रांना अविरत पाणी पुरवठा करण्यासाठी सन 1982 साली नाथसागर धरणावरुन सुमारे 72.00 एमएलडी क्षमतेची मध्यवर्ती पाणी पुरवठा योंजना राबविलेली आहे.

सदर योजनेसाठी महामंडळाने नाथसागराच्या ब्रम्हगव्हाण येथे उदंचन केंद्र (Jackwell) बांधले असुन धरणामध्ये सुमारे 1.50 कि.मी. आतमध्ये Intake Well बांधली आहे व त्यामधुन पाणी पुरवठा केला जातो.

या योजनेमधुन खालील औद्योगिक क्षेत्रांना पाणी पुरवठा करण्यात येतो.

| अ.क्र. | औद्योगिक क्षेत्र | औद्योगिक क्षेत्राचे क्षेत्रफळ (हेक्टर) | केला जाणारा पाणी पुरवठा (एमएलडी) |
|---|---|---|---|
| 1 | वाळुज | 1513.28 | 36.81 |
| 2 | औरंगाबाद | 84.95 | 1.48 |
| 3 | चिकलठाणा | 633.18 | 5.63 |
| 4 | शेंद्रा | 902.88 | 6.85 |

तसेच या मध्यवर्ती पाणी पुरवठा योजनेतुन खालील ग्रामचपंचायतींना पाणी पुरवठा केला जातो.

| अ.क्र. | ग्रामपंचायतीचे नाव | केला जाणारा पाणी पुरवठा |
|---|---|---|
| 1. | रांजनगाव शे.पुं. | 18.50 एमएलडी (द.ल.घ.ली.) |
| 2. | जोगेश्वरी | |
| 3. | रामराईवाडी | |
| 4. | नायगाव | |
| 5. | वाळुज | |
| 6. | घाणेगाव | |
| 7. | ईटावा | |
| 8. | पंढरपुर | |
| 9. | पाटोदा | |
| 10. | वळदगाव | |
| 11. | कमलापुर | |
| 12 | वडगाव कोल्हाटी | |
| 13. | कुंभेफळ | |

या व्यतिरीक्त जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये खालील गावांना टॅंकरव्दारे पाणी पुरवठा केला जातो.

| अ.क्र. | नांव | केला जाणारा पाणी पुरवठा |
|---|---|---|
| 1 | गटविकास अधिकारी औरंगाबाद | 3.50 एमएलडी.<br>सुमारे 284 टॅंकरस् |
| 2 | गटविकास अधिकारी गंगापुर | |
| 3 | गट विकास अधिकारी वैजापुर | |

वरील प्रमाणे आजमितीस सुमारे 56.00 एमएलडी एवढा पाणी पुरवठा दररोज करण्यात येतो.

सर्वांना कल्पना आहेच की, यावर्षी नाथसागर धरणामधील Live Storage संपले असुन मऔविमतर्फे Dead Storage मधुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतु सध्या धरणातील पाण्याची पातळी झपाटयाने कमी होत असुन साधारणपणे <u>दि 01.05.2016 पर्यंत मऔविमच्या **Intake Well** जवळ पाणीच राहणार नाही अशी परिस्थीती निर्माण झाली आहे.</u>

आपातकालीन परिस्थीतीमध्ये विविध गावांना व कारखान्यांना पाणी पुरवठा करणे क्रमप्राप्त असल्याने मऔविमने Intake Well पासुन सुमारे 700 मीटर लांबीची चर खोदणे व तेथे जनरेटरसह पंप टाकुन मऔविमच्या Intake Well मध्ये पाणी आणण्यासाठी निविदा मागविल्या आहेत. सदर निविदा दि 27.04.2016 रोजी उघडण्यात येणार आहेत व पर्यायाने कामास सुरवात करावी लागणार आहे.

नाथसागर धरणातील Submergence चा भाग हा Bird Sanctuary अंतर्गत येतो व त्यामुळे सदर भागात चर खोदण्यासाठी आपल्या विभागाची परवानगी आवश्यक आहे.

सदर काम आपातकालीन परिस्थीतीमध्ये युध्द पातळीवर करावयाचे असल्याने सुमारे 700 मी लांबीची चर खोदणे व तेथे जनरेटरसह पम्प बसवुन पाणीपुरवठा करणे या कामास तात्काळ परवानगी देण्यात यावी हि विनंती.


**सोबत :** स्थळ दर्शक नकाशा

कार्यकारी अभियंता
मऔविम स्थापत्य विभाग
औरंगाबाद.

प्रतः मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद महसुल विभाग, औरंगाबाद यांचे माहितीसाठी सादर.
प्रतः मा. जिल्हाधिकारी, ओरंगाबाद यांचे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतः मा. मुख्य अभियंता, मऔविम नांदेड यांचे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतः मा. अधीक्षक अभियंता, मऔविम औरंगाबाद यांचे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतः कार्यकारी अभियंता, मऔविम वि व यां विभाग औरंगाबाद यांचे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतः प्रादेशिक अधिकारी, मऔविम औरंगाबाद यांचे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.



# Distance of Intake well to Main Godavari Stream



# Proposed Excavation of Water Chanel in Dam Shown

